0 7 DEC 2025

जनप्रवास

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र शिवाजी विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिणानिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी केंद्राचे समन्वयक डॉ. श्रीकृष्ण महाजन, जनसंपर्क अधिकारी डॉ. अलोक जत्राटकर, वाणिज्य अभ्याश मंडळाचे डॉ. केदार मारूलकर, डॉ. तेजपाल मोहेरेकर, प्रा. अविनाश भाले, डॉ. किशोर खिलारे, विक्रम कांबळे आदी उपस्थित होते.

07 DEC 2025

पुढारी





कोल्हापूर : १) गार्डन्स क्लब, महापालिका आयोजित पुष्प प्रदर्शनाचे उद्घाटन करताना उपायुक्त परितोष कंकाळ. शेजारी सत्यजित कदम, राहुल चव्हाण, पल्लवी कुलकर्णी, रूपा शहा आदी. २) महावीर उद्यान येथे पुष्प प्रदर्शनामध्ये रंगीबेरंगी फुले न्याहाळताना तरुणी. (छाया : मिलन मकानदार)

# लोकसहभागातून उद्यानांना ऊर्जितावस्था आणू

## उपायुक्त परितोष कंकाळ; गार्डन्स क्लबच्या पुष्प प्रदर्शनास प्रारंभ

- रंगीबेरंगी फुलांचा बहर; प्लास्टिक प्रदूषण टाळण्यासाठी जागर



अडेनियम (वाळवंटी गुलाब)



पिवळा व भगवा झेंडू



गुलाब

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शहरातील उद्यानांची दुरवस्था झाल्याने महापालिकेने विशेष मोहीम राबवून सर्व उद्याने पर्यावरणपूरक करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यासाठी गार्डन्स क्लबचे सहकार्य मोलाचे आहे. लोकसहभागातून कोल्हापुरातील उद्यानांना ऊर्जितावस्था आणू शकतो, असे प्रतिपादन उपायुक्त परितोष कंकाळ यांनी केले. गार्डन्स क्लब व महापालिकेच्या संयुक्त विद्यमाने महावीर उद्यान येथे आयोजित ५५ व्या पुष्प प्रदर्शन उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. पुष्पप्रदर्शनात किंग ऑफ शो शिवाजी विद्यापीठ व क्विन ऑफ शो शिवाजी विद्यापीठाचा वनस्पतीशास्त्र विभाग ठरला.

कंकाळ म्हणाले, माझी वसुंधरा उपक्रमाअंतर्गत महापालिका सक्रियपणे पर्यावरण जनजागृतीसाठी प्रयत्न करत आहे. महावीर उद्यानाला सेन्सरी गार्डन या संकल्पनेअंतर्गत आणण्यासाठी गार्डन्स क्लब

### किंग ऑफ शो, क्वीन ऑफ शो शिवाजी विद्यापीठ

सहकार्य मोलाचे ठरणार आहे. प्लास्टिकचा वापर रस्ते बांधणीसाठी कसा करता येईल, यासाठी प्रशासन आणि लोकप्रतिनिधी एकत्रित प्रयत्न करणार आहेत.

रात्री बोटॅनिकल फॅशन शो डीजे आणि लाइटिंगच्या साथीने पार पडला. शोमध्ये आगळ्या वेगळ्या कल्पनांसह पाने, फुले व फळे आणि पर्यावरणपूरक साहित्याचा उपयोग करून तरुणाईने वेशभूषांचा आविष्कार सादर केला. अभिनेत्री जुई पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. उद्योजक नीरज झंवर उपस्थित होते. इकेबाना मास्टर्स हरिणाक्षी मिस्त्री व विद्या साळगावकर विशेष अतिथी म्हणून उपस्थित होत्या. मान्यवरांच्या हस्ते स्किट, फॅशन शो, स्पॉट गार्डन डिझाईन यांचे बक्षीस वितरण करण्यात आले. पुष्प प्रदर्शनाचे उद्घाटन उपायुक्त परितोष कंकाळ, शिवसेना जिल्हा समन्वयक सत्यजित कदम, माजी नगरसेवक राहुल चव्हाण, शांतादेवी डी. पाटील यांच्या हस्ते झाले.

यावेळी इकेबाना मास्टर्स अर्चना वैद्य, रागिणी कक्कर, शास्त्रज्ञ एन. के. शर्मा, प्रा. मीनाक्षी देवधर, माजी नगरसेविका माधुरी लाड उपस्थित होते. गार्डन क्लबच्या सदस्या अनिता ढवळे यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. अध्यक्षा पल्लवी कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. सचिव सुप्रिया भस्मे यांनी आभार मानले. नेहा भस्मे यांनी सूत्रसंचालन केले.

07 DEC 2025
सकाळ







**कोल्हापूर** : महावीर उद्यान येथे गार्डन्स क्लबच्या **५५ व्या पुष्प प्रदर्शनाचे** शनिवारी उद्घाटन करताना परितोष कंकाळ. शेजारी मान्यवर. दुसऱ्या छायाचित्रात 'किंग ऑफ शो' शिवाजी विद्यापीठ व 'क्वीन ऑफ शो' बहुमान शिवाजी विद्यापीठ वनस्पतीशास्त्र विभागाच्या दोन गुलाब पुष्पाला मिळाला.

# पुष्प प्रदर्शनातून पर्यावरण जनजागृती : कंकाळ

## 'किंग ऑफ शो' विद्यापीठाचे गुलाब, 'क्वीन ऑफ शो' 'वनस्पती शास्त्र'चे गुलाब

कोल्हापूर, ता. ६ : पुष्प प्रदर्शनाची व्याप्ती वाढविल्यास पर्यावरण जनजागृती होण्यास मदत होईल, असे सांगून महापालिकेकडे पडून असलेल्या ३० टन प्लास्टिकचा वापर रस्त्यांसाठी करण्यासाठी प्रशासन व लोकप्रतिनिधी एकत्रितपण प्रयत्न करतील, अशी ग्वाही महापालिका उपायुक्त परितोष कंकाळ यांनी आज येथे दिली. दरम्यान, पुष्प प्रदर्शनात 'किंग ऑफ शो' म्हणून शिवाजी विद्यापीठाचे गुलाब व 'क्वीन ऑफ शो' म्हणून शिवाजी विद्यापीठ वनस्पतीशास्त्र विभागाच्या गुलाबाला बहुमान मिळाला. हे दोन्ही गुलाब एकाच जातीच्या दोन रंगांचे आहे.

गार्डन्स क्लब आणि कोल्हापूर महापालिकेतर्फे महावीर उद्यान येथे आयोजित ५५ व्या पुष्पप्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. शिवसेना जिल्हा समन्वयक सत्यजित कदम, शांतादेवी डी. पाटील, माजी नगरसेवक राहुल चव्हाण, इकेबाना मास्टर्स अर्चना वैद्य, रागिणी कक्कर, शास्त्रज्ञ एन. के. शर्मा, प्रा. मीनाक्षी देवधर, माधुरी लाड यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते फुलांची माळ गुंफून व रोपट्यास पाणी घालून प्रदर्शनाचे उद्घाटन झाले.

श्री. कंकाळ म्हणाले, 'महावीर उद्यानाला सेन्सरी गार्डन या संकल्पनेअंतर्गत आणण्यासाठी गार्डन्स क्लब सहकार्य ठरेल.' गार्डन्स क्लबच्या अध्यक्षा पल्लवी कुलकर्णी म्हणाल्या, 'पर्यावरणाचे संतुलन, संवर्धन आणि सौंदर्य जतन यासाठी उक्ती आणि कृती याचा ताळमेळ साधणे गरजेचे आहे.'

यावेळी गार्डन्स क्लबची वार्षिक पत्रिका 'रोजेट' व दिनदर्शिकेचे प्रकाशन झाले. सहा हजार कापडी पिशव्यांचे प्रातिनिधिक वाटप भाजी व फळ विक्रेत्या यांना केले. यानंतर उद्यान स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले. गार्डन क्लबच्या सदस्या अनिता ढवळे यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. सचिव सुप्रिया भस्मे यांनी आभार मानले. यावेळी कोषाध्यक्षा प्राजक्ता चरणे, शशिकांत कदम, रवींद्र साळुंखे, सुभाषचंद्र अथणे, संगीता कोकितकर, रचना संपतकुमार आदी उपस्थित होते.

### पाना-फुलांच्या वेशभूषेतून 'बोटॅनिकल फॅशन शो' साकार

प्रदर्शनात आयोजित बोटॅनिकल फॅशन शोमध्ये आगळ्यावेगळ्या कल्पनांसह पाने, फुले व फळे आणि पर्यावरणपूरक साहित्य याचा उपयोग करून तरुणाईने वेशभूषांचा आविष्कार सादर केला. यावेळी सिनेतारका जुई पाटील व अध्यक्षस्थानी मधुरिमाराजे छत्रपती होत्या. उद्योजक नीरज झंवर, इकेबाना मास्टर्स हरिणाक्षी मिस्त्री, सीमा साळगावकर यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते स्किट, फॅशन शो, स्पॉट गार्डन डिझाईन यांचे बक्षीस वितरण करण्यात आले.

0 7 DEC 2025

लोकमत

# राजवर्धनला राष्ट्रीय कुस्तीत ब्राँझ पदक

**म्हाकवे :** उत्तर प्रदेश (गोरखपूर) येथे झालेल्या १७ वर्षांखालील शालेय कुस्ती स्पर्धेत ९२ किलो वजनी गटात बानगे येथील राजवर्धन रवींद्र पाटील याने ब्राँझ पदक पटकाविले. त्याच्या यशाने बानगेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला. मुख्यमंत्री योगी आदिनाथ यांच्या हस्ते पदक देऊन त्याचा गौरव करण्यात आला.

तो जयभवानी तालमीत सराव करत असून, बिद्री येथील मौनी विद्यापीठात शिक्षण घेत आहे. त्याला उपमहाराष्ट्र केसरी रवींद्र पाटील, प्रशिक्षक तुकाराम चोपडे, भाऊसाहेब सावंत, एनआयएस कोच आकाश नलवडे, वैभव तेली यांचे मार्गदर्शन, तसेच बिद्री कारखान्याचे अध्यक्ष के. पी. पाटील, प्राचार्य शिक्षक यांचे प्रोत्साहन लाभले.



कयाकिंगमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या पुरुष संघाने कांस्यपदक प्राप्त केले.

0 7 DEC 2025

पुढारी

# विद्यापीठ सत्र परीक्षेला ७० हजार ७७६ विद्यार्थी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील परीक्षेला ७० हजार ७७६ विद्यार्थी उपस्थित होते. महाविद्यालयांमध्ये पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम परीक्षा व्यवस्थित सुरू आहेत. शनिवारी बीए, बी.व्होक. बीएस्सी, एमएस्सी, एमएड, एमए, डिप्लोमा इन कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, पीजी डिप्लोमा इन टुरिझम आदी १०९ अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या. भरारी पथकाकडून कोल्हापूर ३५, सातारा १ असे ३६ गैरप्रकार नोंद झाल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

07 DEC 2025

जनप्रवास

# विद्यापीठ परीक्षेत ३६ गैरप्रकारांची नोंद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. बीए, बीव्होक, बीएस्सी, एमएस्सी, बीएड, एमए, पोस्ट ग्रज्युएशन डिप्लोमा इन कॉम्प्युटर ॲप्लीकेशन, बीकॉम, कॉम्प्युटर ॲप्लीकेशन, बीएबीएड, पीजी डिप्लोमा इन इनफरमॅटीक, बॅचलर ऑफ स्पेशल एज्युकेशन, बॅचलर ऑफ लॉ, मास्टर ऑफ लॉ, डिप्लोमा इन बिझनेस मॅनेजमेंट, बी फार्मसी, बीटेक, अशा १०९ विषयांची २०० परीक्षा केंद्रावर परीक्षा झाली. ७० हजार ७७६ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. भरारी पथकाकडून कोल्हापूर ३५, सातारा एक अशा ३६ गैरप्रकाराची नोंद झाली, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

07 DEC 2025
लोकमत

# शिवाजी विद्यापीठाला 'खेलो इंडिया'त ४ सुवर्णांसह २० पदके

## प्राची देवकातेला ३००० मीटर स्टीपलचेसमध्ये सुवर्णपदक

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** जयपूर (राजस्थान) येथे सुरू असलेल्या पाचव्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्समध्ये शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडापटूंनी चार सुवर्ण पदकांसह एकूण २० पदके प्राप्त केली. यामध्ये तीन रौप्य आणि १३ कांस्य पदकांचा समावेश आहे. कयाकिंगमध्ये विद्यापीठाच्या खेळाडूंनी नेत्रदीपक कामगिरी करीत सर्वांचे लक्ष वेधून घेतले.



ॲथलेटिक्समध्ये विद्यापीठाच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरीचे प्रदर्शन केले. १०० मीटरमध्ये सुवर्णपदक मिळवून ऋषी प्रसाद देसाई याने दमदार सुरुवात केली, तर प्राची देवकाते हिने ३००० मीटर स्टीपलचेसमध्ये सुवर्णपदक मिळवून स्पर्धेची अखेरही सुवर्णमयी केली.

ॲथलेटिक्समध्ये ११० मीटर अडथळा शर्यतीत विकास आनंदा खोडके याने १४.५१ सेकंदाची वेळ नोंदवत रौप्य पदक प्राप्त केले. तर, ८०० मीटर धावण्यात रिया पाटीलने कांस्यपदक प्राप्त केले.

कयाकिंग व कनोईंग प्रकारात विद्यापीठाच्या खेळाडूंनी पाच कांस्य पदके मिळविली. कनोईंगमध्ये वैयक्तिक गटात १००० मीटर सी-वन प्रकारात प्रिया मारुती चव्हाण हिने कांस्यपदक पटकावले.

कयाकिंगमध्ये विद्यापीठाच्या चमूने चार कांस्य पदके पटकावली. कयाकिंग के-फोर १००० मीटर महिला संघाने कांस्यपदक पटकावले. या संघात आरती जाधव, निकिता मगदूम, सुहाना जमादार आणि प्रणाली कोपर्डे होत्या. याच संघाने के-फोर २०० मीटर महिला गटातही कांस्यपदक मिळवले.

के-फोर ५०० मीटर महिला गटात कांस्यपदक पटकावणाऱ्या विद्यापीठाच्या संघात ऋतुजा पाटील, आरती जाधव, निकिता मगदूम व सुहाना जमादार होत्या. के-फोर २०० मीटर पुरुष गटात कांस्यपदक मिळवून देणाऱ्या संघात करण घुणके, स्वानंद अक्कीवाटे, अमेय भुयेकर आणि श्रीसमर्थ सासणे यांचा सहभाग होता.